# लहान मुलांवरील अत्याचार

पुरन्दरे चन्द्रशेखर




*सीरिया*

चित्र सीरियातील सद्यस्थिती दर्शवते. खाली उजवीकडे निर्वासित छावणीवर अन्नासाठी झुंबड आहे.
उर्वरित जग वरती - डावीकडून उजवीकडे - एक बघ्या, दोन झोपलेल्या स्त्रिया (उदासीनता), दोन बुभुक्षित स्त्रिया - त्या या परिस्थितीचा फायदा घ्यायला आतुर आहेत. डावीकडची लाटांच्या वस्त्रातील मोठी स्त्री (सीरियाचा आत्मा) दूर जात आहे.

**प्रस्तावना**

लहान मुलांवरील अत्याचार हा जगभर अधिकाधिक गंभीर होत असलेला प्रश्न आहे. त्याचा हा संक्षिप्त आढावा आहे.

बालपणी झालेल्या अत्याचारामुळे मुलाचा अकाली मानसिक मृत्यू होतो व प्रौढ आयुष्य पंगुत्वात सुरु होते. याची किंमत संपूर्ण समाज देतो.

सर्वसामान्य मतानुसार अत्याचाराच्या कोणत्याही प्रकारात सत्तेचे असंतुलन असते.

लेखाच्या सोयीसाठी अत्याचारांची ऐच्छिक वर्गवारी केली आहे.

## अत्याचारांची व्याख्या

The United Nations Children's Fund (UNICEF)च्या व्याख्येनुसार मुलांवर केलेली सर्व प्रकारची शारीरिक व मानसिक हिंसा, लैंगिक व इतर शोषण - हे सर्व अत्याचार आहेत. म्हणजे अत्याचार फक्त लैंगिक शोषणापुरते मर्यादित नसतात.

मुलांबाबत लैंगिक शोषण केव्हा होते? कायद्याने लैंगिक संबंधांसाठी निश्चित केलेल्या वयाहून कमी वयाच्या व्यक्तीशी म्हणजे मुलाशी संबंध ठेवणे, त्यासाठी जबरदस्ती करणे, विश्वस्त भूमिकेचा गैरफायदा घेणे, स्वतः सहभाग घेतला नाही तरी असे कृत्य पहाणे, मुलाला देहव्यापारात गुंतवणे - त्यासाठी रोख पैसा किंवा इतर आमिष देणे.

'शिस्ती' अंतर्भूत अत्याचार असे - जोर वापरून केलेली व इजा होण्यासाठी केलेली कोणतीही शारीरिक शिक्षा - मुलाला हिंदकळणे, फटका मारणे, इथपासून सर्व. मानसिक अत्याचारात मुलावर वसकणे; त्याला मठ्ठ किंवा आळशी म्हणणे; शाळा, कॉलेजांमधील ragging, वगैरे.

**आकडेवारी**

२०१६ च्या सर्वेक्षणानुसार जगातील तीन-चतुर्थांश मुलांवर सौम्य किंवा तीव्र शारीरिक/मानसिक/लैंगिक अत्याचार होत असतात. आकड्यात बोलायचे झाले तर दोन ते सतरा वर्षांच्या १२० कोटी मुलांना हा छळ सोसावा लागतो. एका अभ्यासानुसार भारतातील लैंगिक अत्याचारातील बळींमध्ये मुलगे ५२.९४ टक्के तर मुली ४७.०६ टक्के असतात. म्हणजे मुलगे जास्त.

## संस्थात्मक अत्याचार

येथे संस्थाच अत्याचारांकडे दुर्लक्ष करते किंवा हे अत्याचार नाहीतच असे मानते. त्यामुळे अत्याचार चालू रहातात. याचे व्यापक उदाहरण म्हणजे कॅथोलिक चर्च. (या शोषणाचा जागतिक आढावा २०११च्या 'पुरुष उवाच'मध्ये सविस्तर घेतला आहे.) त्याचे गांभीर्य चर्चने अलिकडे मान्य केले. तोपर्यंत प्रकरणे दाबली गेली. ऑगस्टमध्ये कॅथोलिक चर्चचा सर्वोच्च धर्मगुरू पोप फ्रान्सिस आयर्लंडला गेला तेव्हा त्याने या गुन्ह्यांची जाहीर माफी मागितली. (त्यावरून आता वाद चालू आहे.) सप्टेंबर दुसऱ्या आठवड्यात जर्मनीहून १६०० हून अधिक धर्मगुरूंनी साडे-तीन हजार मुलांवर लैंगिक अत्याचार केल्याचे उघड झाले. हा प्रकार गेली साठ वर्षे चालू होता. चर्च हे एक उदाहरण. शाळा, होस्टेल्स, स्पोर्ट्स क्लब्ज, scouts, इत्यादी अनेक ठिकाणी विशेषतः मुलग्यांवर अत्याचार होत असतात.

मध्य प्रदेशातील बैयारगढ नावाच्या ठिकाणी अजय शर्मा या होस्टेल वार्डनने ७ ते ११ वर्षांच्या मुलग्यांचा छळ केला हे मुस्कान नावाच्या एका स्वयंसेवी संघटनेने उघड केले. मुलगे कमी मिळकत असणाऱ्या वर्गातील. हा इसम मध्यरात्री मुलांच्या खोलीत जात असे. त्यांच्यावर गार पाणी ओतत असे व त्यांना पंख्याखाली उभे राहायला भाग पडत असे. ही कोणत्या तरी 'अपराधाची' शिक्षा असे. मुलांना लघवी लागे. मूत्रालयाला जायला शर्मा परवानगी देत नसे. मग ते चड्डीतच लघवी करत. यात अनेक मुलांना त्वचारोग झाले. या त्वचारोगावर औषध लावण्यासाठी शर्मा त्यांच्या गुप्तेन्द्रियांना अयोग्य स्पर्श करत असे, मलम लावत असे व इतर मुलांसमोर गुप्तेन्द्रियांचे चुंबन घेत असे. या सगळ्याचे तो video shooting करत असे. ते शाळेतील इतर विद्यार्थ्यांना व त्याच्या मैत्रिणींना दाखवत असे.

मुस्कानच्या हस्तक्षेपानंतर पालक व मुस्कानच्या कार्यकर्त्या शाळेत गेल्या, तेव्हा बरीच मुले बाहेर रडत पळत आली आणि 'आम्हाला ही शाळा नको' म्हणत मुस्कानच्या शाळेत दाखल झाली.

छत्तीसगढ, मध्य प्रदेश, बिहार, ओरिसा येथील मुलींच्या होस्टेल्समधील अत्याचार ताजे आहेत.

## 'पारंपारिक' अत्याचार

हे 'अत्याचार' नव्हेतच अशी त्या समाजाची धारणा असते. 'पिढ्यान्‌पिढ्या हे असेच चालत आलेले आहे, त्यात काहीच वावगे नाही' अशी घट्ट भूमिका असते. उदा. सती. शेवटची सती बहुधा रूप कंवर - १९८७; बालविवाह. किंवा जगातील अनेक जमातीत मुलग्याचा पुरुष होण्याचे rites of passage असतात. मुलग्याच्या नाकात अणकुचीदार काड्या घालून रक्त काढणे, प्रौढ पुरुषाशी मुखमैथुन करायला लावणे, इत्यादी.

### FGM

FGM म्हणजे female genital mutilation. यात मुलीच्या जननेन्द्रियाचा काही भाग कापण्यात येतो. (त्यातही चार-पाच प्रकार आहेत. सगळेच अतिशय क्लेशदायक.) या कर्माची शारीरिक प्रस्तुती शून्य. फक्त अपायच. World Health Organisation नुसार जगात आज २० कोटींहून अधिक जिवंत स्त्रिया याच्या बळी पडलेल्या आहेत. त्यातील निम्म्याहून जास्त तीन देशांत - इजिप्त, इंडोनेशिया आणि इथिओपिया. या छेदनामुळे अनेक व्याधी तत्काळ होऊ शकतात. कमालीच्या वेदना, प्रचंड रक्तस्राव, जननेन्द्रियाला सूज, ताप येणे, tetanus सारखे infection, मूत्रोत्सर्गात अडथळा, जखम भरून येण्यात विलंब, प्रसंगी मृत्यू. दीर्घकालीन संभाव्य परिणाम - मूत्रोत्सर्ग, मासिक पाळी, संभोग, बाळंतपण सगळे वेदनाकारक होते. प्रसूतीत अडचण येऊ शकते. मानसिक व्याधींमध्ये नैराश्य, सततची चिंता, आत्मविश्वासाचा अभाव, वगैरे अनेक.

**बच्चा बाझी**

हा प्रकार अफगाणिस्तानात आहे. 'बायका मुलांना जन्म देण्यासाठी असतात, मुलगे भोगण्यासाठी असतात.' या समजावर ही प्रथा. बच्चा बाझी म्हणजे अल्पवयीन मुलग्यांशी प्रौढ पुरुष शरीरसंबंध ठेवतो. हे मुलगे ६ ते १८ वर्षांचे असतात. ते मुलीचे कपडे घालून नाच करतात. त्यांना लैंगिक व्यापारात विकले जाते. जमीनदार; सैन्याचे, पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी त्यांना 'ठेवतात'. या प्रथेने आता निराळे वळण घेतले आहे. तलेबान विरुद्ध अफगाण सैन्य या युद्धात तलेबान असे मुलगे सैन्याच्या चेक-पोस्टमध्ये सरकवतात. तो मोह सैनिकांना आवरत नाही. मुलग्यांना 'ठेवले' जाते. अशा मुलग्यांनी काही काळानंतर त्याच पोलीस ठाण्यात, सैनिकांच्या छावण्यात बेछूट गोळीबार करून कित्येक पोलीस, सैनिक ठार मारलेले आहेत. कारण ते तलेबानचे हस्तक असतात. आज आत्मघातकी हल्लेखोराला पकडणे, थांबवणे एकवेळ शक्य आहे पण बच्चा बाझीपासून वाचणे कठीण असे सैन्याचे मत आहे. तरीही धोकादायक भागात नेमणूक होत असली तर काही सैनिक 'बच्चा बाझीला परवानगी द्या' अशी मागणी करतात.

हे मुलगे अत्यंत गरीब कुटुंबातील असतात. कुटुंबीयच त्यांना दलालांना विकतात. या मुलग्यांच्यात गंभीर मानसिक विकार निर्माण होतात. सततचा ताण, अविश्वास आणि नैराश्य यात दुष्मनी आणि सूड घेण्याची इच्छा यांची भर पडते. सततच्या बलात्काराची प्रतिक्रिया म्हणून तो करणाऱ्यांना ते गोळ्या घालतात किंवा त्यांना विष घालतात. विशीत आल्यावर हे तरुण स्वतःसाठी बच्चा शोधतात आणि ही प्रथा चालू रहाते.

***चिबोक मुली***

चित्र लेखातील चिबोक घटनेवर आहे. डावीकडे खाली कोपऱ्यात या मुली दिसतात. त्यांच्या सुटकेसाठी येणारे अतिदूर आहेत.



## युद्ध किंवा संघर्षग्रस्त प्रदेशातील अत्याचार

**सीरिया**

इथे फक्त सीरियाचे उदाहरण घेतले आहे. पण हाच प्रकार येमेनमध्ये चालू आहे.

सीरियातील यादवी गेली आठ वर्षे चालू आहे.

आज सीरियात सुमारे सव्वा कोटी लोकांना जिवंत रहाण्यासाठी तातडीने मदतीची जरुरी आहे - अन्न, निवारा, औषधे, सुरक्षा इ. त्यातील निम्मी मुले आहेत. मध्यंतरी एक रिपोर्ट टी.व्ही.वर आला होता. एक संपूर्ण गाव सततच्या बॉम्बिंगच्या भीतीने जमिनीखाली वसले आहे. जेव्हा केव्हा क्वचित दोन्ही बाजू युद्धबंदी काही तासांपुरती जाहीर करतात, तेव्हा मुले वर येतात, रस्त्यावर खेळतात. एरवी अपुऱ्या अंधारात आयुष्य. मलमूत्रविसर्जन भुयारातील कोपऱ्यात पडद्यामागे.

सीरियातील ६६ लाख लोक अंतर्गत विस्थापित आहेत. त्यात २८ लाख मुले आहेत. रोज सरासरी साडेसहा हजार लोक विस्थापित होतात. या जानेवारीपासून हिंसाचार वाढला. त्यात काहीशे मुले मरण पावली. मदत करणाऱ्या संस्थांना विरोधी बाजूच्या इलाक्यात जाऊ दिले जात नाही. अशा इलाक्यात सुमारे ३० लाख लोक आहेत. जाऊ दिलेच, तर औषधे न्यायला परवानगी नसते. UNICEF सारख्या अग्रगण्य जागतिक दर्जाच्या संस्थेचे असे प्रयत्न मागच्या वर्षी १०५ वेळा असफल ठरले. इतर स्वयंसेवी संघटना दूरच. यामुळे गेल्या वर्षात मुलांचे मृत्यू ५० टक्केने वाढले आहेत. इदलीब नावाच्या शहरात आणखी रक्तपात सप्टेंबर दुसऱ्या आठवड्यात सुरू झाला आहेच.

युद्धाचा आणखी एक दुर्दैवी परिणाम म्हणजे मुलग्यांची सैनिक म्हणून भरती. हा प्रकार युगांडा, इराण, म्यानमार येथेही आढळलेला आहे. मुलग्यांची 'निर्भयता', शस्त्रे शिकण्याची तत्परता, चपळता व परिणामांविषयी अज्ञान याचा वापर होतो. वस्त्या जाळणे, आत्मघातकी हल्ले करणे याला मुलगे बिचकत नाहीत.

हे सीरियाचे अंतर्गत चित्र. ज्यांना शक्य होते ते देश सोडून गेलेले आहेत. असे निर्वासित एक कोटीहून जास्त. ते बहुशः शेजारच्या तुर्कस्तान, लेबानन, जॉर्डन वगैरे देशात गेले. तेथे ते निम्नमानवी तात्पुरत्या छावण्यात रहातात.

एका दोन वर्षांपूर्वीच्या अंदाजानुसार या प्रदेशात आज दीड कोटी मुले शिक्षणाशिवाय वाढत आहेत. उपासमार, रोगराई आहे. सभोवताली अत्यंत हिंसक

वातावरण असते. इराकमध्ये जेव्हा इस्लामिक स्टेट आक्रमक होते, तेव्हा त्यांनी गोऱ्या नागरिकांचे सार्वजनिक शिरच्छेद केले. रस्त्यावर माणसाला गुडघ्यावर बसवून तलवारीने मुंडकी उडवण्यात येत असत. प्रसिद्धीसाठी हे videoही प्रसृत केले. त्यात बघ्यांची गर्दी दिसते आणि लहान मुलगे गर्दीतून पुढेपुढे घुसण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांना ही हत्या पहिल्या रांगेतून पहायची असे. यातील अत्यल्प जरी आतंकवादी झाले तर नव्या पिढीत नवीन हिंसा.

हे युद्धाचे प्रत्यक्ष परिणाम. आता एक अप्रत्यक्ष परिणाम पाहू.

इराक-सीरियात इस्लामिक स्टेट जेव्हा जोमात होते, तेव्हा पृथ्वीवर शुद्ध इस्लामचा स्वर्ग येणार या प्रचाराला भुलून चाळीस देशातून तेथे लोक गेले. पश्चिम, रशिया व शेजारच्या मुस्लीम देशांतील अनेक स्त्रियाही आल्या. काही वडिलांनी/नवऱ्याने जायचे ठरवले म्हणून, काही स्वखुशीने. अनेकींची स्टेटच्या योद्ध्यांशी लग्ने झाली (काही सक्तीने), काहींना त्यांच्यापासून मुलेही झाली. तेथे गेल्यावर अनेकजणींचा भ्रमनिरास झाला कारण स्वप्नातला स्वर्ग आणि वस्तुस्थितीतील महदंतर. परतीची वाट कबरीकडे. मग 'योद्धे' मरण पावले किंवा परांगदा झाले. आता या स्त्रिया व मुले त्रिशंकू अवस्थेत आहेत. त्यांचे काय करायचे हे कोणालाच माहिती नाही. त्या इराक व सीरियातील विविध छावण्यात अडकलेल्या आहेत. त्यातील काही भागात निर्नायकी आहे. केंद्र सरकार किंवा कोणतेच निर्णयक्षम सरकार नाही. त्यांच्या मायदेशांना त्या नको आहेत कारण तेथे आत्मसात केलेल्या जहाल इस्लामचा त्या परतल्यावर प्रचार करतील. यातील कितीजणींचे खरोखर मनोपरिवर्तन झाले असावे व त्या यापुढे 'नीट' वागतील याचीही खात्री नाही. सीरिया, इराकलाही त्या नको आहेत कारण मुळात त्या त्या देशांच्या नागरिक नाहीत आणि तेथे आल्या त्या उपद्रव देण्यासाठी. अधिक गंभीर प्रश्न मुलांचा आहे. (एका छावणीतच ९०० हून अधिक मुले आहेत.) ती कोणत्याच देशाचे नागरिक नाहीत. शिक्षण, आरोग्यसेवा नाहीच. याचा अंत काय हेही माहित नाही.

**चिबोक**

नायजेरियातील चिबोक गावातून १८ वर्षांखालच्या २७६ शालेय मुलींना १३-१४ एप्रिल २०१४ च्या रात्री बोको हराम या मुस्लीम दहशतवादी संघटनेने पळवले. त्यांचा अपराध म्हणजे त्या शिकत होत्या. (बोको हराम म्हणजे पाश्चात्य शिक्षण इस्लामला मंजूर नाही). पळवलेल्या मुलींचा लिलाव करून त्यांना गुलाम म्हणून/ बायको म्हणून विकण्यात आले. गेल्या चार वर्षात बोको हरामने सोडलेल्या, पळून आलेल्या, सापडलेल्या मुलींखेरीज ११२ मुलींचा आजतागायत पत्ता नाही. सरकार आणि हा गट यांच्यातील एका मध्यस्थाच्या मते ११२ पैकी फक्त १५ मुली आज जिवंत आहेत. बाकीच्या कशा मारल्या गेल्या असतील हे कल्पनातीत आहे. या वर्षांत ५ मुलेही जन्माला आली. आया व मुलांना समाजाने वाळीत टाकले आहे कारण बाप कट्टर इस्लामी, त्याची प्रजा नको.

हाच प्रकार यावर्षी फेब्रुवारीमध्ये बोको हरामने दापची नावाच्या गावात पुन्हा केला व ११२ मुलींना पळवले. त्यातील पाच मरण पावल्या. उरलेल्या बोको हरामने सरकारबरोबर वाटाघाटी झाल्यावर सोडल्या. बोको हराम खंडणीसाठी व त्यांचे कैदी सरकारने सोडावेत म्हणून हा उद्योग करते.

## राजकीय अत्याचार

**म्यानमार**

म्यानमारमधील रोहिंग्या मुस्लीम त्या देशातील त्यांच्याविरुद्धच्या सरकारी वांशिक हिंसाचाराने देशोधडीला लागले आहेत. सुमारे आठ लाख शेजारच्या बांगलादेशात बकाल निर्वासित छावण्यात आहेत. त्यातील निम्मी १७ वर्षांखालची मुले आहेत. मागच्या वर्षी किमान १५०० पोरकी मुले नदी, जमीन, जंगल यातून हा बिकट प्रवास करून त्यांची ती आली. कारण आई-बापांचा पत्ता नाही. अनेकांनी घरे जाळली जाताना पाहिली आहेत, कत्तली पाहिल्या आहेत. स्त्रियांनी म्यानमारच्या सैनिकांनी मुलांना आगीत फेकून देऊन ठार मारलेले पाहिले आहे. त्यांच्यावरील बलात्कारातून जन्माला आलेली मुले हा नवीन प्रश्न आहे.

२७ ऑगस्टला संयुक्त राष्ट्रसंघाने हा वंशच्छेद आहे असे जाहीर केले. वंशच्छेद म्हणजे हिटलरने ज्यूंचे शिरकाण केले, तसा आंतरराष्ट्रीय पातळीवर सगळ्यात गंभीर गुन्हा. यासाठी काही वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांवर कारवाई होणे अपेक्षित आहे (आणि नाही.)

**अमेरिका**

सवयीनुसार ट्रम्पच्या अमेरिकेने आणखी एक आततायी व क्रूर निर्णय घेतला. मध्य व दक्षिण अमेरिका खंडातून विशेषतः मेक्सिको, ग्वाटेमाला आणि होण्डूरास देशातून अमेरिका देशाला येऊ पहाणाऱ्या लोकांची संख्या मोठी असते. गरीबी, बेरोजगारी, असुरक्षितता इत्यादी सर्वश्रुत कारणे असतात. अधिक, या देशातील drugs gangs तेथे ८-९ वर्षांच्या मुलग्याला दोनच पर्याय देतात - gang मध्ये सामील हो नाहीतर मृत्यू. स्थलांतराचे हेही एक कारण आहे.

हे अवैध स्थलांतरण थांबवण्यासाठी अमेरिका-मेक्सिको सीमेवर भिंत बांधण्याची घोषणा ट्रम्प निवडणुकीदरम्यान सतत करत असे. एप्रिल/मेमध्ये ट्रम्पने याबाबत zero tolerance असे धोरण जाहीर केले. त्याअन्वये ज्या स्थलांतर इच्छुकांना अमेरिकेत प्रवेश करण्यासाठी वैध परवानगी नव्हती (आणि बहुतेक असेच), त्या कुटुंबांतील आई-वडील व मुले यांची अमेरिकेच्या सीमा-सुरक्षा

*रस्त्यावर रहाणारी मुले : त्यांना 'आत' येऊ द्या*

चित्र 'रस्त्यावर रहाणाऱ्या मुलां'वर आहे. वरच्या भागात या मुलांची घरे दिसतात. ती घरे लांडगे झाली म्हणून मुले रस्त्यावर आली. त्यांना आपण आपल्या घरात येऊ दिले तर ती फार तर पियानोशी खेळतील किंवा अन्नासाठी फ्रीज धुंडाळतील.



दलाने फारकत केली. अवैध स्थलांतर करणे हा आई-बापांचा गुन्हा इतपत कारवाई समजू शकते पण मुलांना, अगदी अंगावरचे दूध पिणाऱ्या काही महिन्यांच्या मुलांना सरकारने ताब्यात घेतले. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही पूर्वतयारी केलेली नव्हती. त्यामुळे ताब्यात घेतलेल्या सुमारे २,६०० मुलांना देशात घाईघाईने कोठेही नेण्यात आले व शंभरहून अधिक तात्पुरत्या छावण्यात ठेवण्यात आले. उदा. ३०० मुले न्यूयॉर्कला आली (३,००० कि.मी. वर). ती येणार याची न्यूयॉर्कच्या मेयरलाही कल्पना नव्हती. या बेपर्वाइचे अमेरिकेअंतर्गत व जगातून निषेध झाले. कोर्टानेही ताशेरे ओढले. मग ट्रम्पने तितक्याच घाईने कुटुंब व मुले एकत्र आणावीत असा आदेश दिला. पण ते कसे, केव्हा, कोण आणणार याबाबत खालपर्यंत गोंधळ चालू आहे. त्यात मुले व त्यांचे स्वतःचे आई-बाप कोण हे ठरवण्यासाठी DNA चाचणी आवश्यक ठरली. त्याची तयारी केलेली नसल्याने आणखी कालहरण झाले. या सगळ्या तमाशाविरुद्ध ३० जूनला अमेरिकाभर लोकांनी मोर्चे काढले. सप्टेंबर पहिल्या आठवड्यापर्यंत पाचशेहून अधिक मुले पालकांच्या प्रतीक्षेत होती. त्यातील २२ पाच वर्षाखालाची. सरकारी निष्क्रियतेने आता स्वयंसेवी संघटना त्यांना त्यांच्या मायदेशी रवाना केलेल्या आई-बापांकडे पाठवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

या मुलांना आताच गंभीर मानसिक विकार व्हायला सुरुवात झाली आहे. आईवडिलांपासूनच्या अचानक ताटातूटीचा हा धक्का. अनेकजण काहीच बोलत नाहीत, एकलकोंडी असतात, परका माणूस दिसला तर अतिशय घाबरतात, लहान आवाजाने दचकतात. एकूण ती सतत भीतीखाली असतात. जे आई-बापांकडे परत गेले, ते क्षणभरसुद्धा, अगदी toiletला जायला देखील पालकांना नजरेआड होऊ देत नाहीत. याचे दीर्घकालीन परिणाम भयावह आहेत.

## एकले अत्याचार

वरील प्रामुख्याने सामाजिक चर्चेनंतर एक व्यक्तिनिष्ठ उदाहरण पाहू. त्यातून प्रत्यक्षात एखादी घटना उलगडत असता कशी रंग बदलते हे कळावे. त्याबरोबरच पश्चिमेतील आजचे प्रवाह कळावेत.

२०१७च्या ऑक्टोबरमध्ये me too (मी पण/मलासुद्धा) या नावाची चळवळ इंटरनेटवर सुरू झाली. ती हां हां म्हणता जगभर पसरली. कामावर किंवा त्या निमित्ताने स्त्रीला नको असताना पुरुष लैंगिक आगाऊपणा/प्रसंगी बलात्कार करतात याला वाचा फुटू लागली. काही स्त्रियांनी त्यांचे असे अनुभव मांडल्यावर हजारो-लाखो स्त्रियांनी 'मला पण' असाच अनुभव आला हे twitter या social media वर सांगितले/अजून सांगत आहेत. म्हणून

चळवळीचे नाव - me too.

हॉलिवूडमधील निर्माता, दिग्दर्शकापासून खालपर्यंत पुरुषांच्या अशा वर्तनाला इच्छुक अभिनेत्री पूर्वापार बळी पडत आलेल्या आहेत. (आपल्याकडे आंध्रमध्ये अलीकडेच श्री रेड्डी नावाच्या एका अभिनेत्रीने अशा प्रकाराविरुद्ध रस्त्यावर जाहीर निषेध व्यक्त केला होता.) हॉलिवूडमधील एक मोठे नाव हार्वी वाइनस्टाईन. सुरुवातीला अशा बलिष्ठ व्यक्तींविरुद्ध असा आरोप करणे मोठेच धाष्ट्यांचे होते. कारण त्या तुमचे करिअर संपवू शकतात. पण त्या दिवसांत एशिया अर्जेन्तो नावाच्या अभिनेत्री/दिग्दर्शिकेने हे धाडस दाखवले. ती २१ वर्षांची असताना कान्स फिल्म फेस्टिवलमध्ये वाइनस्टाईनने तिच्यावर बलात्कार केला होता. जवळजवळ ८० स्त्रियांनी त्याच्याविरुद्ध असेच लैंगिक आक्रमकतेचे दावे केले आणि me too चळवळ जन्माला आली.

पण या ऑगस्टमध्ये एक बातमी पुढे आली. जिमी बेनेट नावाचा हॉलिवूडमधील होतकरू अभिनेता/गायक. एशिया अर्जेन्तोने २०१३ साली दारू पाजून आपल्यावर लैंगिक बळजबरी केली असा त्याचा दावा. जिमी तेव्हा १७ वर्षांचा होता तर अर्जेन्तो ३७. घटना घडली कॅलिफोर्नियात. तेथे लैंगिक संबंधांचे वय किमान १८ आहे. त्यामुळे हा लहान मुलावरील अत्याचार झाला.

म्हणजे ज्या प्रवृत्तीविरुद्ध ती सार्वजनिक भूमिका घेत होती, तोच उद्योग एका अल्पवयीनाबरोबर तिने केला होता. त्यात तिने ते प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केल्याचेही बाहेर आले. me tooमध्ये सक्रिय झाल्यानंतर तिने जिमीला गप्प राहण्यासाठी सुमारे चार लाख डॉलर्स दिले आणि त्यांचे एकत्र फोटो ताब्यात घेतले. प्रथम तिने जिमीचे आरोप नाकारले व असे घडलेच नाही हा पवित्रा घेतला. नंतर घडले हे मान्य केले. पण जिमी १८ पेक्षा कमी वयाचा हे मला माहीतच नव्हते, सेक्समध्ये पुढाकार त्यानेच घेतला, वगैरे सफाई देण्याचा प्रयत्न केला. तरी तिची आणि चळवळीची विश्वासार्हता धोक्यात आली. चळवळीच्या नेतृत्वाने आता एशियाशी संबंध तोडले आहेत.

यात गुंतलेले अनेक पदर मुलांवरील स्वैर (random/casual या अर्थी) अत्याचाराला लागू आहेत. प्रथम बळजबरी, नंतर घटना नाकारणे, अगदी गळ्याशी आल्यावर आपण पुढाकार घेतला नाही असे म्हणणे, इत्यादी.

## संभाव्य अत्याचार

नजीकच्या भविष्यात हे अत्याचार होण्याची शक्यता आहे.

**आसाम**

आसाममधील National Registry of Citizens (NRC) चा मसुदा नुकताच प्रकाशित झाला. त्यानुसार तेथील ४० ते ५० लाख लोक भारतीय नागरिक नाहीत. त्यांचे भवितव्य अचानक अंधारात गेले आहे. प्रामुख्याने ते १९७१ च्या युद्धात बांगलादेशातून आले. मुले भारतात जन्माला आली. त्यांना हाच देश मायभूमी आहे. या लोकांना आता परतीचा मार्ग नाही. पण या स्थलांतरित मुस्लिमांविरुद्ध उजव्या हिंदू शक्तींच्या भावना तीव्र आहेत. अभिजित शर्मा नावाच्या माणसाने NRC ची ही न्यायप्रक्रिया २००९ ला सुरु केली. त्याच्या शब्दात 'हे लुंगी आणि टोपी घालणारे बांगलादेशी इथले नागरिक नाहीत. आमचे लोक आळशी म्हणून यांना अंग-मेहेनतीची तरी कामे मिळतात. त्यांना आसामी, हिंदी भाषा येत नाहीत, ते फक्त बांगला बोलतात. ते बलात्कारी, चोर आणि लफंगे आहेत. मला तेरा वर्षांची मुलगी आहे. तिच्यासारख्या मुलींना हे पळवतात आणि अत्याचार करतात. यांच्या मुलांना डॉक्टर, इंजिनीअर, बँकर होण्याचा हक्क नाही...'

एकीकडे इतका विद्वेष आणि दुसरीकडे त्यांना भारतातून हद्दपार करण्याची वैध अशक्यता लक्षात घेता मोठाच सामाजिक उद्रेक संभवतो. त्यात हिंसाचार झाला तर बळींच्यात मुलेही असणार.

**वेनेझुएला**

हा देश दक्षिण अमेरिका खंडातील. तेथे गेली काही वर्षे संपूर्ण अराजक आहे. अर्थव्यवस्था 'व्यवस्था' अशी राहिलेली नाही. चलन कोसळले आहे. त्यामुळे मुलांचे कुपोषण अतोनात वाढले आहे. लाखांनी लोक देश सोडून शेजारच्या देशांना जात आहेत. आतापर्यंत १६ लाख. (देशाची लोकसंख्या सुमारे ३ कोटी). ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापासून निर्वासितात गरोदर स्त्रियांचे प्रमाण जास्त वाढताना दिसत आहे. प्रसूती व जन्माला येणारे मूल यासाठी वेनेझुएलातील परिस्थिती आश्वासक नाही. म्हणून नाजूक शारीरिक अवस्थेतही त्यांनी हा दुष्कर पर्याय स्वीकारला आहे. त्या ब्राझील, कोलंबिया, इक्वेडोर, मेक्सिको, पेरू इ. देशांत जाऊ पहातात. तेथे त्यांचे स्वागत, त्यांना उपलब्ध होणारी आरोग्यसेवा संशयास्पद आहे. शिवाय वर म्हटल्याप्रमाणे drugsच्या व्यापारात वाहक म्हणून निर्वासितांची मुले अधिकच संभाव्य भक्ष्य.

## Media आणि अत्याचार

पूर्वग्रहाने, अज्ञानाने किंवा त्यांच्या 'वार्तामूल्याच्या' प्राधान्यक्रमाने प्रसारमाध्यमे मुलग्यांवरील अत्याचारांकडे जगभर दुर्लक्ष करतात. एरवीही Mediaच्या एखाद्या बातमीत घटनेचे सुलभीकरण होते, घटना विपर्यस्त रूपही घेते. बारीकसारीक तपशील वगळले जातात. Media ठरवेल तो 'मूळ मुद्दा' फक्त मांडला जातो. 'दुसरी बाजू' कमीत कमी दाखवली जाते. त्यामुळे प्रेक्षकाला घटनेकडे निराळ्या दृष्टीने पहाण्याची संधी मिळत नाही.



*Bacha Bazi*: Pedophilia by another name

बातमीला अल्पायुष्य असते. तिचा पाठपुरावा बहुधा होत नाही. त्यामुळे समाजाच्या उथळीकरणात भर पडते. दोन वाजताची बातमी तीन वाजता विरून गेलेली असते. वर्तमान असा तुकड्या-तुकड्यात पुढे येतो. त्याची संगती media लागू देत नाही. (पुढील case-studies media ने कशा दिल्या असत्या याची कल्पना करावी.)

Media समाजातील रूढ पूर्वग्रह दृढ करतो. शक्यतो त्यांना धक्का लागू देत नाही. त्यासाठी वेगळ्या संदर्भातील एक उदाहरण घेऊ. श्रीदेवीच्या मृत्यूनंतर ती दारू प्याली होती, तिच्या अनेक Plastic surgeries झाल्या होत्या हे वारंवार आवर्जून सांगण्यात आले. दारू पिणे, Plastic surgeries बरे का वाईट हा मुद्दा नाही. (आणि media यावर चर्चा करतही नाही.) दारू पिणे वाईटच, Plastic surgeries संशयास्पदच हे रूढ समज मात्र mediaने घट्ट केले. पार्टीत ती अशी किती दारू प्याली असणार, त्यामुळे ती बाथटबमध्ये बुडून मरण पावणे शक्य असेल का ही शंका media उपस्थित करत नाही, करतो ते अधांतरी तर्क. आणि मध्य प्रदेश सरकार तिला देण्यात येणारा पुरस्कार दारू पिण्याच्या बातमीवरून रद्द करते!

एकूण media लोकशिक्षण टाळतो, विवाद्य प्रक्रियांवर सखोल चर्चाही टाळतो. येतात ते दोन मिनिटांचे 'तज्ज्ञ'. बातमीवर आमच्या channel वरही चर्चा झाली एवढेच mediaचे उद्दिष्ट दिसते. (उदा. सप्टेंबर दुसऱ्या आठवड्यातील विजय मल्ल्याच्या जेटलींबरोबरच्या तथाकथित भेटीची वार्ता. सगळ्या चॅनेल्स्वर हीच बातमी कित्येक तास चालू होती.)

या प्राधान्यक्रमात मुलांवरील अत्याचाराची सवंग बातमी येऊ शकते, मीमांसा नाही.

Internet-social media वरील मुलांबाबत अशा वाढत्या घटनांची (sexting, bullying ची) किंवा child pornography इत्यादींची दखल विस्तारभयास्तव येथे घेतलेली नाही.

## भारत

भारताच्या लोकसंख्येत ४० टक्के मुले आहेत. जगात भारत ६ व्या क्रमांकाचा 'लहान मुलांसाठी असुरक्षित' देश आहे. युनिसेफ आणि भारत सरकारचा १३ राज्यांचा एक संयुक्त अभ्यास २०१७ ला प्रकाशित झाला. त्यानुसार सुमारे ५५ टक्के मुलग्यांवर अत्याचार होतात. ८८ टक्केहून जास्त मुलांवर पालक अत्याचार करतात. (इथे अत्याचाराची सुरुवातीला दिलेली व्यापक व्याख्या लक्षात ठेवावी.) ६५ टक्के मुलांना शाळेत शारीरिक शिक्षा होते. निम्मी मुले आठवड्याचे सातही दिवस काम करतात. वाढत्या पर्यटनउद्योगाने ६व्या वर्षापासूनच्या मुलग्यांवरील अत्याचार वाढत आहेत. बालमजुरी, भीक मागायला लावणे, हॉटेलमध्ये नाच ते लैंगिक शोषणापर्यंत. उदा. खजुराहो, उज्जैन, जगन्नाथपुरी, तिरुपतीमध्ये.

रस्त्यावर राहणारी मुले, काम करणारी मुले आणि संस्थांमध्ये ठेवलेली मुले यांचे लैंगिक शोषण इतर मुलांपेक्षा जास्त होते. याच अत्याचाराची परत शक्यता किंवा त्यांनाच दोषी धरले जाईल या भीतीने मुले या प्रसंगांची तक्रार करत नाहीत.

या संदर्भात तीन case-studies पहाण्यासारखे आहेत.

पहिल्या केसमध्ये नऊ वर्षांच्या एका मुलग्याला शाळेत जायचे नसे, तो अभ्यासात मागे पडत होता, नीट झोपत नसे व आतल्या आत कुढत असे. त्याच्या वडिलांचे किराणाचे दुकान होते. त्यांच्या सांगण्याप्रमाणे मोठी मुले त्याला 'दुकानातून पैसे आण' म्हणून सारखा त्रास देत. एक दिवस त्याच्या १४ वर्षांच्या भावाने वडिलांना सांगितले की हा मुलगा गर्ह्य चाळे करतो. कसले चाळे विचारल्यावर त्याने सांगितले की त्याने एक video पाहिला. त्यात त्याचा भाऊ एका १८ वर्षांच्या मुलाशी मुखमैथुन करत होता. दुसऱ्या एका १२ वर्षांच्या मुलाने हे video शूटिंग केले होते. बाकी मुले या video वरून त्या ९ वर्षाच्या मुलाला blackmail करत होती आणि दुकानातून पैसे उचल अशी मागणी करत होती. मग मुलाच्या वडिलांनी त्या १८ वर्षांच्या मुलाला ठोकून काढला. कुटुंबीय त्या १८ वर्षांच्या मुलाला कोर्टात खेचायला तयार होते पण त्यांना स्वतःच्या मुलाला मानसशास्त्रीय मदत देण्यात रस नव्हता. 'त्याला योनी तर नाही, तो गर्भार तर राहणार नाही. त्याने पुरुषासारखे वागावे, रडूबाईसारखे नाही.' असे कुटुंबीयांचे म्हणणे. हा पुरुष-

स्त्री यांच्या भूमिका काय असाव्यात याबाबतचा ठाम पूर्वग्रह. वस्तुतः मुलाला post-traumatic stress disorder होती. अभ्यासात मागे पडणे, झोप न येणे, वगैरे या विकाराची लक्षणे होती. तो मुलगा आहे म्हणजे यातून काही काळाने आपलाआप बाहेर येईल हे गृहीत चूक आहे.

दुसरी केस एका चार वर्षाच्या मुलग्याची. त्यालाही शाळेत जायला नको असे, झोप येत नसे, तो टीव्हीवर पहाटे तीनपर्यंत कार्टून्स पहात बसे.

खोलात जाता कळले की शाळेच्या toiletमध्ये दोन मोठ्या मुलांनी त्याच्यावर अत्याचार केला होता. एकाने त्याला दाबून धरले, दुसऱ्याने गुदमैथुन केले. नंतर मुलगा बरा झाला. त्याला शाळेत रसही वाटू लागला. पण या प्रकरणाने वडिलांनी नोकरी सोडली व कुटुंबाने मूळ गावी जाण्याचा निर्णय घेतला. त्याच्या वडिलांचे म्हणणे - 'ही मुलगी असती तर बोभाटा होईल या भीतीने शाळेने काहीतरी केले असते.' हे पुरुषप्रधान संस्कृतीचे संस्थात्मक उदाहरण. त्यामुळे पालक हताश झाले. ते काहीही करू शकत नव्हते आणि त्यांना अपराधीही वाटत होते. शाळेला हा मुलगा आहे, मुलगी नाही म्हटल्यावर आपले नाव खराब होणार नाही याची खात्री होती.

तिसरी केस एका सात वर्षाच्या मुलाची. तो परदेशातून आला होता, आई गेली होती, वडील आजारी असत म्हणून तो अनाथाश्रमात होता. तो बऱ्यापैकी इंग्रजी बोलू शके, त्याला पियानो वाजवता येई, तो सौम्य आणि शांत होता. शिक्षकांचाही लाडका होता. पण (किंवा त्यामुळे) त्याला शाळेतील इतर मुले त्रास देत. वडील त्याला दर शनिवार-रविवारी घरी घेऊन जात. त्याला आंघोळ घालताना त्यांचा लक्षात आले की त्याच्या गुप्तांगावर ओरखडे आहेत. मुलाने सांगितले की त्याच्यावर तिथलाच एक १४ वर्षांचा मुलगा लैंगिक अत्याचार करतो.

पोलीस चौकशीत निष्पन्न झाले की दुसऱ्या मुलाला वडील नव्हते, आई वर्षातून एकदा भेटायला येई आणि ती कधीच भेटवस्तू आणत नसे. त्याने मान्य केले की या मुलाबद्दलच्या असूयेपोटी तो त्याच्यावर लैंगिक सत्ता दाखवत असे.

बलात्कारी मुलग्याला मानसशास्त्रज्ञाकडे पाठवण्यात आले.

या केसमध्ये मुलाविषयी वडील जागरूक असल्याने निदान प्रकरण बाहेर तरी आले.

दुर्दैवाने व्यवस्था अशी आहे की प्रथम मुलांवरील अत्याचार समोरच येत नाहीत. जे काही अत्यल्पांशी येतात, त्यात मुलींना प्राधान्य मिळते. कोणत्याही स्वयंसेवी संघटनेत किंवा हॉस्पिटलमध्ये अशा अत्याचारावर इलाज करून घेणाऱ्या बहुतांशी मुली असतात. तिथपर्यंत जाणाऱ्या भारतात विरळाच, मग तिथपर्यंत न जाणाऱ्या मुलग्यांची संख्या कितीतरी पटीत असावी.

मुलींवर व मुलग्यांवरही अत्याचार बहुधा पुरुष करतो. पुरुषप्रधानता समलिंगी संबधांना अयोग्य मानते. त्यामुळे बळी असलेल्या मुलग्याचा लैगिक कल तसा असू शकेल असा संशयही निर्माण होते.

तसेच मुलग्यांनी अशा प्रसंगाची तक्रार करणे किंवा रडणे अपेक्षित नसते कारण 'पुरुष' रडत नाहीत. शाळातील शारीरिक शिक्षांचाही हा एक हेतू व परिणाम.

## निरीक्षण

एकूण चित्र पहाता या अत्याचारांमागे एक सलग धागा दिसत नाही. सत्तेचे असंतुलन हा अपूर्ण खुलासा आहे. मुळात ती सत्ता टिकून रहायला बृहत्ससमाजाची सत्ता समीकरणांबाबत, पर्यायाने अत्याचारांबाबत उदासीनता हे महत्त्वाचे कारण आहे. दुसरे कारण म्हणजे राष्ट्र-राज्याची अंतर्गत मगरूरी. मग ती अमेरिका असो, वेनेझुएला असो वा सीरिया. त्यावर नियंत्रण नाही.

तसेच या दुर्लक्षातील क्रम लक्षात यावा. प्रथम कौटुंबिक पातळीवर प्रश्न दाबला जातो, मग संस्थात्मक दुर्लक्ष होते, मग media कडून. त्यामुळे हा प्रश्न आहे, हेच बृहत्समाजापर्यंत, म्हणजे आपल्यापर्यंत, पोचत नाही.

इतर विचारार्ह मुद्दे असे -

बदलत्या अर्थव्यवस्थेत रुळू न शकण्याने येणारी पुरुषी परात्मता (उदा. शेतकऱ्यांच्या आत्महत्या).

भारतातील व्यस्त स्त्री-पुरुष प्रमाण. (तेच अफगणिस्तानात). याचा परिणाम वाढत्या बलात्कारांच्या घटनांत, पर्यायाने मुलांवरील अत्याचारात होत असावा.

आपल्याला जे मिळत नाही ते आपल्यापेक्षा कमी लायक लोकांना मिळते याची न्याय्य किंवा अन्याय्य खदखद पुरुषांच्यात वाढत आहे. लैंगिक अत्याचारात ती व्यक्त होते. बलात्कारा संदर्भातील अमेरिकेतली एका अभ्यासाचा हा निष्कर्ष आहे. दिल्लीचे व नंतरचेही अनेक 'निर्भया' प्रसंग या दृष्टीने पहाता येतील. तेच कारण मुलांवरील वाढत्या अत्याचारांचे असू शकते.

*(लेख लिहिल्यानंतर काही आठवड्यांनी me-too चळवळ भारतात सुरू झाली.)*

*चन्द्रशेखर पुरन्दरे, इंग्लंड*
*www.art-non-deco.com*
*artnondeco@yahoo.co.uk*

❒